**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित औषधनिर्माणशास्त्र संस्थेत प्रवेशक्षमता बदल करण्यास, नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र संकिर्ण-२०१०/(१६५/२०१०)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० जून, २०१०.

संदर्भ:- १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली यादी .
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेले पत्र क्र. २/ एनजीसी/अभातंशिप-यादी/शा.मान्यता/२०१०/१२४१, दिनांक ३० जून, २०१०.

**शासन निर्णयः-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संकेतस्थळावर खाली नमूद केलेल्या औषधनिर्माणशास्त्र संस्थेत खालील द्वितीय पाळीत पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम व पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता बदल सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | शै. व. २००९-१० ची प्रवेशक्षमता | शै. व. २०१०-११ ची प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|---|
| १ | आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, करवंद नाका, शिरपूर, जिल्हा धुळे | **प्रवेशक्षमता बदल** | | |
| | | बी. फार्मसी | ६० | २४० |
| | | एम. फार्म. फार्मास्युटिक्स | १५ | १८ |
| | | एम. फार्म. क्लिनीकल फार्मसी | १० | १८ |
| | | **द्वितीय पाळी अभ्यासक्रम** | | |
| | | बी. फार्मसी | ०० | ६० |
| | | एम. फार्म. फार्मास्युटिक्स | ०० | १८ |
| | | एम फार्म. क्वालिटी ॲश्युरंस | ०० | १८ |

२. आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून संस्थेत उपरोक्तप्रमाणे नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम व प्रवेशक्षमता बदल करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि